## विद्यार्थी प्रवेश करीता नियम व अटी

१. कुटुंबाचे पुणे महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला (रेशनिंग कार्डची साक्षांकित प्रत आवश्यक) तसेच ३ वर्षे वास्तव्य असलेल्या राहण्याचा पुरावा म्हणून गत ३ वर्षाचा मनपा टॅक्स पावती किंवा लाईट बिल किंवा टेलिफोन बिल (लॅण्डलाईन) किंवा झोपडी फोटो पास/झोपडी सेवा शुल्क पावती/भाडे करारनामा इ. जोडावे.

२. **शैक्षणिक पात्रता–** पदवी/पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण आवश्यक.(प्रमाणपत्र व गुणपत्रक सोबत जोडणे आवश्यक.)

३. **वय मर्यादा–** MPSC / UPSC करीता वय मर्यादा खालील तक्यात दर्शविणेत येत आहे.

| Category | MPSC | UPSC |
|---|---|---|
| **मागासवर्गीय** | ४३ | ३७ |
| **खुल्यागट** | ३८ | ३२ |

(वयाच्या पुराव्यासाठी जन्म दाखला/ससून हॉस्पिटल येथील वयाबाबतचा दाखला, शाळेचा दाखला, शैक्षणिक पात्रतेचा दाखला इ. एक आवश्यक)

४. **जातीचादाखला :–** मागासवर्गीय विद्यार्थ्यांची जातीचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक.

५. दिनांक १/५/२००१ नंतर जन्माला आलेल्या व हयात अपत्यांमुळे कुटुंबाच्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा जास्त झाल्यास योजनेचा लाभ मिळणार नाही.

६. प्रवेश घेते वेळेस अनामत रक्कम रू. १०००/– चलनाने पुणे मनपाकडे जमा करावी लागेल व प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर सदरची रक्कम चेकने अदा केली जाईल.

७. प्रशिक्षण करीता प्रवेश घेते वेळेस उपरोक्त अटी विषयक सर्व मूळ कागदपत्रे दाखविणे बंधनकारक राहील.

८. प्रशिक्षण करीता निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी अनामत रक्कम पुणे महानगरपालिकाकडे जमा करतेवेळेस ऑन लाईन अर्जाचे प्रिन्ट सह (सर्व कागदपत्रे ही साक्षांकित करणेत येवून )अर्जासोबत जोडावीत व अर्ज कै. एस.एम.जोशी हॉल, दारूवाला पूलाजवळ, सोमवार पेठ, पुणे. येथे जमा करावा.

९. स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कालावधी एक वर्षाचा असणार आहे.

१०. अर्ज स्विकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार मा. उप आयुक्त, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडे राहील.

**(रंजना गगे)**
उप आयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका